गुरुवार, दि. २० मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २२७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शिवद्रोही प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांना अटक करून राजद्रोहाचे गुन्हे दाखल करा; मराठा क्रांती मोर्चा, शिवप्रेमींची मागणी

## नागपूर दंगलीला मुख्यमंत्री-गृहमंत्री जबाबदार - डॉ. लाखे पाटील

जालना । प्रतिनिधी - शिवद्रोही प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांना केलेली वक्तव्ये ही त्यांच्या संस्कृती दाखवते, त्यांना सरकारने तात्काळ अटक केली नाही. ज्याप्रमाणे इतर गुन्हेगारांवर कारवाई होते, तसे न करता त्यांना जास्तीत जास्त वेळ देण्यात येत आहे. त्याचबरोबर काही सरकारच्या मर्जीतल्या हिंदुत्ववादी संघटनांना पुढे करून औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी ही केवळ मराठा सामाज्यांचा सर्वश्रेष्ठ इतिहास मिटविण्याचे कारस्थान असल्याचा गंभीर आरोप मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक डॉ. संजय लाखे पाटील यांनी केला आहे. नागपूर येथील दंगलीला मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे जबाबदार असल्याचेही डॉ. लाखे पाटील यांनी येथे म्हटले आहे.

मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्र तसेच सहयोगी मराठा व विविध सामाजिक संघटना व शिवप्रेमी संघटनेच्यावतीने मराठा सेवा संघ कार्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जगन्नाथ काकडे, अशोक पडूळ, करण जाधव, राम देठे, संदीप ताडगे, सुभाष कोळकर, रवी वाडेकर, नरसिंग पवार, काकासाहेब खरात, संजय देशमुख आदींची उपस्थिती होती.

दरम्यान राज्य सरकारने गांभीर्याने विचार करून शिवद्रोही प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांना ताबडतोब अटक करून राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावे अन्यथा जालना जिल्ह्यासह राज्यभरात तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा मराठा-शिवप्रेमी संघटनांकडून देण्यात आला आहे. याचाच भाग म्हणून शुक्रवार (दि २१) रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. व सोमवार (दि २४) रोजी जिल्ह्यात ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशाराही पत्रकार परिषदेद्वारे देण्यात आला आहे.

डॉ. लाखे पाटील म्हणाले की, शिवद्रोह्यांना राज्यसरकार ममत्वाची वागणूक देत आहे. त्यांच्या माज आलेल्या भाषेला सरकारकडून संरक्षण मिळत असल्यामुळे त्यांचे धाडस वाढत चालले आहे. शिवद्रोह्यांमागील मास्टरमाईंडचा शोध घेण्यात येत नाही. किंवा त्यांच्या विरोधात कारवाई होत नाही ही वस्तुस्थिती आहे. याच प्रवृत्तींनी यापुर्वीसुद्धा राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संदर्भात सुद्धा असंस्कृत, विकृत, घाणेरडी विधाने केली आहे. राज्याचे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा देखील अशी वक्तव्य केले होते. परंतु राज्य सरकारने बोटचेपी भूमिका घेतल्यामुळे अशा राष्ट्रद्रोही शक्तीचे मनोबल वाढले आहे. अशा गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांचा कायमचा बंदोबस्त करावा जेणे करून इतरांना जरब अशी मागणी यावेळी करण्यात आली.

नागपूर येथील दंगलीला मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार असल्याचा गंभीर आरोप यावेळी डॉ. लाखेपाटील यांनी केला. दंगलीला तीन दिवस झाले मात्र, अद्याप गृहमंत्री नागपूरला गेले नाहीत. सरकार धार्जिण्या काही हिंदुत्ववादी संघटनांनी सकाळी राडा करण्याचा प्रयत्न केला. मोठी दंगल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, मराठा समाजासह बहुजन समाज व अठरा पगड जातींनी आता हुशार झाली आहे. त्यांनी ठरवले आहे या संघटना जनसामान्यांचा प्रश्नांवर आवाज उठवत नाही, आरक्षणाचा मुद्दा असो अथवा महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न यावर ज्या संघटना काम करत नाही त्या संघटनांच्या आंदोलनात सहभागी व्हायचे नाही. त्यामुळे नागपूरात कुणीही बाहेर पडले नाही. आणि त्यांचा डाव फसला असल्याचेही डॉ. लाखे पाटील म्हणाले.



औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यकर्ते बेजबाबदार प्रक्षोभक विधाने करत आहेत. मराठ्यांच्या व रणरागिणी छत्रपती ताराराणी यांच्या शौर्याची निशाणी उखडून टाकण्याचे षडयंत्र रचले जात आहे. सरकारला जर कबर हटवायची असेल तर त्यांनी स्वतः कुदळ हाती घ्यावे, धर्मा-धर्मात, जाती-जातीत तेढ निर्माण करू नये, भारतीय पुरात्तव विभाग आणि निती आयोगाच्या शिफारशीने देशातील १८ पुरातत्व स्थाने वगळल्या गेली. त्याचप्रमाणे कायद्यानुसार औरंगजेबाची कबर सरकारने हटवावी. सध्या राज्यात व देशात त्यांचीच सत्ता आहे. नाहक राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडेल, सामाजिक सोहार्द संपेल आणि गल्लीबोळात दंगे होतील अशी बेजबाबदार वातावरण निर्माण करु नये.

छावा चित्रटपटाने चांगला गल्ला जमवला आहे, मात्र, यात इतिहासाची तोड-मोड करून पुढे आणला आहे. हे सर्व स्क्रिप्टेड आहे. शिर्के घराण्यांचा खोटा इतिहास दाखविण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रुर मृत्यू ला कारणीभूत असलेल्या सल्लागार वर्गाचा सहभाग लपविला आहे. सिनेमाची कथा म्हणजे इतिहास नाही याचे भान ठेवून वक्तव्य करण्यात यावीत असा सल्ला देखील डॉ. लाखे पाटील यांनी यावेळी राज्यकर्त्यांना दिला.

सर्वसत्ताधीश मुघल बादशहा औरंगजेब याला झुंजवत याच भुमीत गाडला आणि मुघल सल्तनत खिळखिळी करून टाकली अशा मुघलमर्दिनी रणरागिणी छत्रपती ताराराणी यांचे भव्य अश्वारुढ स्मारक मुंबई मंत्रालयासह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात उभी करावीत. त्यांचा फोटो मंत्रालय प्रवेशद्वार व सर्व शासकीय कार्यालयात तातडीने लावण्यात यावेत. शालेय, महाविद्यालय, संशोधन अभ्यासक्रमात छत्रपती ताराराणी यांच्या शौर्याचा इतिहास सामाविष्ट करण्यात यावा, पान २ वर

युवा आदर्श

**प्रसिद्ध ...**

विधानसभा पायरी
झाली फार प्रसिद्ध
ठाण मांडून बसले
विरोधक ते सिध्द
पायरी ही हॉट सीट
भडकते सदैव युध्द
वाक्बाण सटा सटा
सत्ताधारी हो विध्द
चालली गाणी गोष्टी
पाझरु लागते पद्य
घोषणा नाविन्यपूर्ण
बहरू लागले गद्य
चित्रविचीत्र आवाज
वाजवत रहावे वाद्य
मदमस्त झाले सारे
न पिताचं करसे मद्य
पायरी वरती ठणाण
विसरे कर्तव्य आद्य
असा नाटक तमाशा
काय होईलं रे साध्य
आंदोलनाचा प्रकार
मिडीयाला द्या खाद्य
लक्षात हवे ठेवायला
हेतू असावा विशुद्ध

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# जनतेला त्रास न होता भूमाफियांना कडक शासन करू - चंद्रशेखर बावनकुळे

## जालन्यातील ५५३ व ५५८, ५५९, ५६० सर्व्हे नंबर बाबत आ. खोतकर यांची विधानसभेत लक्षवेधी

मुंबई - जालना शहरात चुकीचे व खोटे दस्ताऐवज निर्माण करून ५५८, ५५९, ५६० हे बोगस सर्व्हे नंबर निर्माण केले बाबत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी विधानसभेत लक्षवेधी मांडली. यावर जनतेला त्रास न होता भूमाफियांना कडक शासन करु असे आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.
आ. खोतकरांच्या प्रश्नांवर बोलतांना मंत्री बावनकुळे यांनी अतिशय संयमी व जनतेच्या म्हणजेच या चारही सर्व्हे नंबर वर सध्या घर बांधून राहत असलेल्या लोकांना त्रास होणार नाही याची काळजी शासन घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या जमिनी संदर्भात विभागीय आयुक्तांकडून चौकशी करुन अहवाल मागवण्यात येईल व फाटक कमिशनचा अहवाल मा. उच्च न्यायालयाकडून मिळवून त्यावर जमिनीवर सध्याची परिस्थिती लक्षात घेता योग्य निर्णय घेण्यात येणार असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

जालना शहरामध्ये चुकीचे आणि खोटे दस्ताऐवज निर्माण करून ५५८, ५५९, ५६० हे बोगस सर्व्हे नंबर निर्माण केले आहेत. यातील शेकडो एकर शासनाची जमिन आबड परिवाराने घशात घातली आहे. जवळपास शंभर एकर जमिन सामान्यांना विकली. लोकांची फसवणूक होणार नाही. या सामान्यांना न्याय मिळावा त्यांना ही जागा अधिकृत करून देण्यात यावी, अशी मागणी आ. खोतकर यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे केली. एसडीएमने मा. न्यायालयात शपथपत्र दिले. ५५७ सर्व्हे नंबर हा शेवटचा सर्व्हे नंबर आहे. सीलींग कायद्यावेळीही आबड परिवाराने ५५८, ५५९, ५६० जमिनी त्यांनी नसल्याचे कळविले होते. ५५८,५५९,५६० आणि ५५३ हे सर्व्हे नंबर दिवाणी न्यायालय, उच्च न्यायालयांने याचिका फेटाळली आहे.



मा. उच्च न्यायालयाने पाठक कमिशन नेमले होते. त्याचा अहवालही गायब केला गेला. त्यांना मा. न्यायालयाने मुळ दस्ताऐवज मागितले पान २ वर

# कर्तव्यावर असतांना लाईनमनला जीवे मारण्याची धमकी

## शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**परतूर । प्रतिनिधी** - शहरात साईबाबा चौकात लाईनमन रामेश्वर भामट हे कर्तव्य बजावत असताना त्यांना शासकिय कामात अडथळा निर्माण करीत शिविगाळ करुन धक्काबुक्की केल्या प्रकरणी पोलिसात एका जणांविरुद्ध गून्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ रामेश्वर भामट यांनी परतूर पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की वरिष्ठ तंत्रज्ञ परतुर शहरे कार्यालय येथे गेल्या तिन वर्षापासुन नेमणुकीस आहे.परतुर शहर विभागात कार्यरत आहे. दि. १८ मार्च २०२५ रोजी दुपारी एक वाजताचे सुमारास साईबाबा चौक भागातील थकीत विजबिल धारकांचे खंडित केलेले विजेचे कनेक्शन जोडुन परत येत असतांना साईबाबा चौकातील रस्त्यावरील एक ग्राहक वीज पुरवठा खंडित केल्याने तो पुर्नजोडणी बाबत चौकशी करित होता. तेव्हा त्याठिकाणी ईसम नामे सोन्यासिंग टाक रा.परतुर हा माझ्या जवळ आला. त्याने लाईनमनच्या हातातील वीजच्या ग्राहकांची यादी व पेन हातातुन हिसकावुन घेऊन अशोक मधुकर माठे रा.सेलु रोड परतुर या नावाचे विजेचे कनेक्शन वापरतो तु वीज पुरवठा खंडित का केला. असे विचारले असता तेव्हा त्यास म्हणालो ७३४०, रुपये वीज बिल थकीत असल्याने विजेचे कनेक्शन कट केले आहे. असे म्हणताच सोन्यासिंग टाक पान २ वर

दीपसान रेमेडी
http://exclusivemaharashtra.com/
https://www.lokadhikarlive.com/
https://arjunastra.in/
वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
वेब पोर्टल, युट्युब चॅनल
वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय
वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन
9975387225 8390098886

# संपादकीय

## मानव मुक्तीचा सत्याग्रह

भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा २० मार्च हा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे., स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत., मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित, स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेवश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेवश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत नुकसान भरपाई देणार - कृषीमंत्री कोकाटे

**मुंबई -** नैसर्गिक आपत्तीमुले बाधित शेतकऱ्यांना देय असलेली नुकसान भरपाई देण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने १०० दिवसांच्या कृती आराखड्यात समाविष्ट केला आहे. यानुसार शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसान भरपाईपोटी त्यांना देय असलेली रक्कम ३१ मार्चपर्यंत दिली जाईल, असे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत लक्षवेधीच्या उत्तराप्रसंगी सांगितले.

परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान पीक विम्याची रक्कम मिळावी या संदर्भात सदस्य राजेश विटेकऱ्यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती. त्या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य राहुल पाटील व सई डहाके यांनीही सहभाग घेतला. राज्य शासन शेती व शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगून मंत्री श्री. कोकाटे यांनी सांगितले, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस व पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांना तातडीने देण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली आहे.

# महाराष्ट्रात जालना जिल्ह्याची रेशीम निर्मितीकडे वाटचाल

रेशीम शेतीमध्ये अडचणी कमी आहेत व इतर पिकांच्या तुलनेत उत्पादन क्षमता अधिक व चांगले उत्पन्न हमखास मिळत असते. बदलत्या हवामानामध्ये संरक्षित पिक म्हणूनही रेशीम शेती ओळखल्या जाते. हवामान बदलामुळे शेती करताना शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागते मात्र रेशीम शेतीमध्ये अवकाळी पाऊस, गारपीट याचा विपरित परिणाम होत नाही. जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी महारेशीम अभियानातंर्गत तसेच जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वेळोवेळी शेतकरी मेळावे आणि रेशीम शेतीकडे लक्ष केंद्रीत करण्यासाठी वेळोवेळी विविध उपक्रम राबविले त्याचेच फलित म्हणून आज मोठ्या प्रमाणात शेतकरी रेशीम शेतीकडे आकर्षित झाले आहेत. रेशीम अंडीपुंज ते रेशीम धागानिर्मिती पर्यंतची प्रक्रीया असलेला जालना जिल्हा महाराष्ट्र राज्यात एकमेव ठरला असून महाराष्ट्रात जालना जिल्ह्याची रेशीम निर्मितीच्याबाबतीत स्वयंस्फुर्तीने यशाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली आहे

**रेशीम उद्योग विकास योजनेची वैशिष्टे :-**

शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याची क्षमता असणारा उद्योग, पर्यावरण पुरक उद्योग, गारपीट व अवर्षण प्रवण भागातही तग धरणारा उद्योग, प्रतिमहा उत्पन्नाची शाश्वती, हवामानातील बदल सहन करणारा उद्योग, इतर नगदी पिकांच्या तुलनेत पाण्याचे प्रमाण अतिशय कमी लागते. सुशिक्षित बेरोजगार, महिला व प्रौढ व्यक्तींना काम देणारा हा उद्योग आहे. जालना जिल्ह्यात सद्यस्थितीत एकूण १ हजार १३२ शेतकऱ्यांकडे ११५० एकर क्षेत्रामध्ये तुती लागवड आहे. पारंपरिक पीक कापसापेक्षा २ ते ३ पट अधिक उत्पादन मिळत असल्यामुळे तसेच अवकाळी पावसातही रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले नाही, त्यामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी रेशीम शेतीकडे आकर्षित होत असून मोठ्या प्रमाणात तुती लागवड करीत आहेत. सन २०२३-२०२४ मध्ये जालना जिल्ह्यात ४ लाख १ हजार ७०० अंडीपुंजाचे वाटप तसेच त्यापासुन २ लाख ४७ हजार १८७ कि.ग्रॅम रेशीम कोषांची निर्मिती झाली आहे. सन २०२४-२५ मध्ये माहे फेब्रुवारी २५ अखेर जालना जिल्ह्यात ३ लाख ६४ हजार ५०० अंडीपुंजाचे वाटप करून २ लाख १४ हजार कि.ग्रॅम रेशीम कोषांचे उत्पादन झाले आहे. मनरेगा अंतर्गत रेशीम विकास योजनेच्या माध्यमातुन सन २०२३-२४ मध्ये जालना जिल्ह्यात १ लाख ६ हजार ६४५ मनुष्यबळाला रोजगार निर्मिती झाली आहे. सन २०२४-२५ मध्ये १८ मार्च अखेर मनरेगा अंतर्गत एकुण ९२ हजार ३१९ मनुष्य दिन रोजगार निर्मिती झाली आहे.

**रेशीम कोष बाजारपेठेची उभारणी :-**

रेशीम कोष विक्री करीता शेतकऱ्यांना एक हजार कि.मी. दुर कर्नाटक राज्यातील रामनगरम येथे जावे लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक, मानसिक, शारिरीक त्रास सहन करावा लागत होता. शासन व रेशीम संचालनालयाच्या पुढाकाराने जालना येथे राज्यातील पहिली रेशीम कोष खरेदी-विक्रीची बाजारपेठ कृषि उत्पन्न बाजार समिती, जालना येथे २०१८ पासुन सूरू केली आहे. या बाजारपेठेमध्ये सन २०२३-२४ मध्ये ८ हजार ६६७ रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी रूपये ३४.१६ कोटी किंमतीचे एकुण ७९५.०९ मे. टन रेशीम कोषांची खरेदी-विक्री केली आहे. तसेच रेशीम कोषांना प्रति क्विंटल सरासरी ४३ हजार रूपये दर देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये माहे फेबुवारी २५ अखेर जालना रेशीम कोष बाजारपेठेत ९.५५ कोटी रूपयाचे २४९.२२ मे.टन रेशीम कोषांची खरेदी-विक्री करण्यात आली.

**आतंरराष्ट्रीय दर्जाचे ॲटोमॅटीक रेशीम रिलींग मशीन उभारणी :-**

जालना येथे अंदाजे रूपये २ कोटी किंमतीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ॲटोमॅटीक रिलींग मशीनची उभारणी करण्यात आली असुन याद्वारे जागतिक स्तरावरील उत्कृष्ट दर्जाचे रेशीम सुताची निर्मिती जालना जिल्ह्यात करण्यात येत आहे. यामुळे कामगारांना रोजगार मिळाला असुन पैठणी करीता आवश्यक उच्च दर्जाचे रेशीम सुत जालना येथे तयार होत आहे. रेशीम सुत उत्पादनाचे पुढील प्रक्रीया, रेशीम धाग्यास पीळ देणे, रेशीम धाग्याची रंगणी करून धागा कापड विणकामास तयार करणे व त्यापासुन हातमागवर कपडा बनविण्याच्या कामासाठी जिल्हा वार्षिक योजनेतुन निधी मंजुर करण्यात आला असुन लवकरच प्रत्यक्ष कामास सुरूवात होत आहे. यामुळे जालना येथील रेशीम कोषांवर सर्व प्रक्रीया जालना येथे होवून जालना सिल्क ब्रँडचा रेशीम कपडा लवकरच जालना येथे तयार होणार आहे.

**रेशीम कोष बाजारपेठ नवीन इमारतीचे वैशिष्टे :-**

जालना येथे राज्य सरकारच्या मंजुरीनुसार रेशीम कोष बाजारपेठ इमारतीच्या बांधकामास पुर्णत्व आले आहे. या १३८९.५१४ चौरस मिटर क्षेत्रफळ असणारी भव्य दुमजली इमारत, कोष खरेदी-विक्रीसाठी भव्य लिलाव हॉल, कोष ड्राय करणे, साठवणुक करण्यासाठी सुविधा, कोषांची प्रतवारी ठरविण्यासाठी कोष तपासणी यंत्रणा, रेशीम शेतीच्या शेतकरी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण हॉल, कार्यालयाची प्रशासकीय इमारत, मिटींग हॉल ई-नाम कार्यप्रणाली आदि सुविधांनी युक्त इमारत बांधकामास एकुण निधी रू.६.१३ कोटी खर्च झाला आहे.

**महाराष्ट्रातील पहिले खाजगी अंडीपुंज निर्मिती केंद्र :-**

यापुर्वी जालना जिल्ह्याकरीता रेशीम अंडीपुंज शासनाचे गडहिंग्लज जि.कोल्हापुर किंवा बेंगलोर कर्नाटक राज्य येथुन पुरवठा करण्यात येत होता. यामध्ये वाहतुकी दरम्यान अंडीपुंजास इजा पोहचुन अंडीपुंज उबवन कमी होण्याचा धोका संभावत होता तसेच वाहतुक खर्च ही मोठ्या प्रमाणात करावा लागत होता. नामांकित महिको सिड्स कंपनीने जालना येथे रेशीम अंडीपुंज निर्मितीला सन २०२२-२३ पासुन सुरूवात केली. यामुळे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची अंडीपुंज, आवश्यक तापमान व आर्दतामध्ये उबवन करून उपलब्ध होत आहे तसेच या केंद्रामुळे अंडीपुंज उपलब्धेसाठी इतर राज्यावर अवलंबून राहणे संपुष्टात आले आहे.

**महाराष्ट्रातील सर्वाधिक क्षमता असलेले चॉकी केंद्र :-**

जालना जिल्ह्यातील कचरेवाडी येथे महाराष्ट्र राज्यातील पहिले तापमान व आर्दता स्वयंनियंत्रीतची सुविधा असणारे चॉकी केंद्र आहे. या चॉकी केंद्राची चॉकी किटक तयार करण्याची मासिक क्षमता १ लाख अंडीपुंज असुन वार्षिक १२ लाख अंडीपुजाची चॉकी करून शेतकऱ्यांना वाटप करण्याची क्षमता, कचरेवाडी येथील 'सॉईल टु फॅब्रिक चॉकी केंद्र' यांची आहे. यामुळे जालना जिल्ह्यातील तसेच लगतच्या इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना, शास्त्रोक्त तापमान व आर्दतामध्ये वाढ केलेले चॉकी किटक उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या कोष उत्पादनामध्ये जवळपास १५ टक्के वाढ झाली आहे.

रेशीम कोषांना हमी भाव असून प्रति किलो रूपये ३००/- पेक्षा कमी दर मिळाल्यास प्रति किलो रू. ५०/- अनुदान देण्याची तरतूद आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्यासाठी रेशीम शेती फायदेशीर ठरते. रेशीम उद्योगातून जालना जिल्हयातील अनेक शेतकरी एक एकर क्षेत्रावर वार्षिक जवळपास २.५ लाखांपेक्षा अधिक उत्पादन घेत आहेत. रेशीम शेतीपासून शाश्वत उत्पादन मिळते. मनरेगा अंतर्गत कुशल अनुदानामध्ये चांगली वाढ झाली असून आता प्रति एकर रू. ४.१८ लाख अनुदान देण्यात येते, त्यामुळे रेशीम उद्योगाची सुरूवात करण्यास शेतकऱ्यांना मदत होत आहे. जालना जिल्ह्यात रेशीम कोष बाजारपेठ, आंतर राष्ट्रीय दर्जाचा रेशीम धागा तयार करणारी ॲटोमॅटीक रिलींग मशीनची दोन युनिट आहेत. त्यामुळे रेशीम अंडीपुंज ते रेशीम धागानिर्मिती पर्यंतची प्रक्रीया असलेला जालना जिल्हा महाराष्ट्र राज्यात एकमेव आहे. सर्व सुविधा जागेवर मिळत असल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पन्न वाढीसाठी रेशीम शेतीचा मार्ग धरणे लाभदायी ठरेल.

**- जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

# आठवणीतले मास्तर ...

बऱ्याच लोकांच्या आयुष्यात भाऊ, दादा, नाना, शेठ, डयाडी, साहेब अशा आदरार्थी 'नावाने ' एक वेगळं घर केलेले असते. अशापैकीचं माझ्या आयुष्यातलं अन लोकांनी प्रेमाने जपलेल नाव म्हणजे मास्तर . मास्तर म्हणजे माझे आजोबा. अगदी पेशाने मास्तर नाही पर आपल्या चाणाक्ष बुद्धीने अन स्वकर्तृत्वावर, जिव्हाळ्याने कमावलेलं नाव म्हणजे मास्तर. अंगावर निळा फुल हाताचा शर्ट, त्यावर छोटे चेक्सचा लाल किंवा नीळा कब्जा ( जॅकेट ), गोल धोतर, डोक्यावर गांधी टोपी, हातात पान, सुपारी अन खणाची झालर असलेली कापडी पिशवी, अन करावं करावं आवाज करण्याऱ्या चामड्याच्या वाहना असा अगदी ठेवणीतला रुबाब.

कोकणात भातशेती हा प्रमुख व्यवसाय. म्हणजे एक जमाना असा असायचा की घराच्या बाजूला देखील भातशेती केली जायची. मास्तरांचा देखील भातशेती हा प्रमुख व्यवसाय होता. जोड धंदा म्हणून ते लाकडाचा व्यापार करायचे. घरात किंवा उंबराच्या झाडाला मोठाला तराजू लावलेला असायचा. आम्ही लहान पोरं त्यावर स्वतःचे वजन करायचो. नाहीतर सी सॉ खेळायचो. एक वेगळीच मजा होती ती. शेती प्रमुख व्यवसाय असल्यांने बैल जोडी ही मास्तरांची आवड होती. पूर्वी मास्तरांची बैल गाडी देखील होती. बैल कसा पाहिजे तर पांढरा शुभ्र, सुंदर, पोपट, निशाण, राजा, माणिक असे कितीतरी बैल मास्तरांच्या वाड्यात (गोठयात ) आले. मग त्या बैलांना पाणी, चारा, पेंड, आंबवन घालणे ही काम मास्तर स्वतः अगदी जातीने करायचे. मास्तरांकडे आलेला बैल तसा नशीबवानच समजायचा. मास्तरांकडे असलेल्या जर्सी गाईचं त्यांनी तिच्या उतरत्या वयात खूप चांगलं संगोपन केलं. ते तिला लक्ष्मी मानायचे. अगदी एकाद्या घरासारखा भला मोठा मास्तरांचा गोठा होता. म्हणजे त्या गोठयात जेवणाची पंगत देखील बसवली तर माणस खुशीने जेवतील इतका टाप टीप.



तसा मास्तरांचा स्वभाव अगदी प्रेमळ अन थट्टा मस्करी करणारा. अगदी निवांत वेळी वाडीतला एखाद पोर समोरून चाललं असलं तर त्याला अमक्या पोरीच्या नावाने चिडवणे वा पोरींना तमक्या पोराच्या नावाने चिडवणे हा मास्तरांचा छोटासा विरंगुळा. मे महिनाच्या सुट्टीत मुंबई वरून आपली नातवंड येणार अशी खबर लागली मास्तर जाम म्हणजे जाम खुश. मग काय नातवांसाठी अगोदरच आंब्यांची आडी तयार. चिल्लर पार्टीला सकाळी रानात घेऊन जाणे हा मास्तरांचा मे महिन्यातील नित्याचा दिनक्रम. रात्रीच जेवण आटपल की अंगणात मस्त गप्पा गोष्टी रंगायच्या. अधी- मधी- कधी मास्तर त्यांच्या विशिष्ट्य लकबमध्ये एक गोष्ट सांगायचे तर कधी उखाणे ( कोडी ) घालायचे. मास्तरांची एक आरामखुर्ची होती. मास्तर खुर्ची वरून उठले रे उठले की आम्ही पोरं त्या खुर्चीवर बसण्यासाठी तडमडायचो. पण मास्तर येताना दिसले की लागलीच खुर्ची खाली करायचो. त्या अजाण वयात देखील मास्तरांबद्दल इतका आदर होता.

आज मास्तरांची नातवंड मोठी झाली. स्वतःच्या पायावर उभी राहिली. मास्तरांच्या घराला स्पारटेक्सच्या लाद्या लागल्या. चिऱ्याच्या भिंतीना कॉंक्रिटचा मुलामा आला, घराची डागडुजी झाली, पण मास्तर निघून गेल्याची पोकळी कायमची राहून गेली. आज पुन्हा एकदा मास्तरांनी डोळ्यांच्या कडा ओल्या केल्या. खरंच आयुष्य खुप सुंदर आहे, का तर आयुष्यात मास्तरांसारखी माणसं आली.

**वैभव वाघे, भाईंदर, ७७३८२०१३६३**

पान ४ वरुन

## पुढील महिनाभरात ...

सूचना आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना जो अहवाल घ्यायचा आहे त्या व्हिडिओ कॉन्फरन्स साठी गटविकास अधिकारी परतुर, मंठा व जालना यांना लेखी स्वरुपात कळवून वॉटर ग्रीड योजनेमध्ये समाविष्ट असल्या गावातील सरपंच आणि ग्रामसेवक यांना देखील निमंत्रित करावे ग्रामसेवक आणि सरपंच यांनी गावातील परिस्थिती मांडावी व त्याचा तोंडी व लेखी स्वरूपातील अहवाल मुख्य अभियंता यांनी आमदार बबनराव लोणीकर आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव श्री अभिषेक कृष्णा यांना द्यावा असे या बैठकीदरम्यान निश्चित करण्यात आले. यादरम्यान गावागावातील पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे काय? चेंबर बांधून तयार आहे का? रिटर्न वॉल बसवण्यात आले आहेत का? पाईपलाईन पूर्ण झाली आहे का? किती दिवसापासून पाणी पिण्यासाठी मिळत आहे किंवा नाही? याची लेखी व तोंडी स्वरूपात माहिती देण्यात यावी अशी सूचना देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी केली. गावातील पाण्याच्या टाकीत पाणी आल्यानंतर पुढील जबाबदारी ग्रामपंचायतची असून ग्रामपंचायतीन प्रती कुटुंब ७०० रुपये कोटेशन भरून घेतल्यानंतर कुटुंबाच्या रांजणापर्यंत पाणी देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची आहे. प्रत्येक ठिकाणी पाईपलाईनची होणारी तूट-फूट रोखण्यासाठी हायड्रोलिक टेस्ट करणे अत्यंत आवश्यक असून त्याची रजिस्टर तयार करण्यात यावे. या रजिस्टरवर लोकप्रतिनिधी अधिकारी यांच्या उपस्थितीत फोटोग्राफ घेण्यात यावेत गावकऱ्यांच्या उपस्थितांच्या सह्या घेण्यात याव्यात जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत पाईपलाईनची तूट फुट होत राहणार आहे त्यामुळे अधिकाऱ्यांनी हायड्रोलिक टेस्ट संदर्भात अत्यंत गांभीर्याने विचार करणे आवश्यक असून हायड्रोलिक टेस्ट न केल्यास अधिकाऱ्यांना त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला.

पान १ वरुन

## शिवद्रोही प्रशांत ...

अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली.

रणरागिणी छत्रपती ताराराणी व छत्रपती थोरले शाहू महाराज यांचे सातारा येथे उच्च दर्जाचे समाधीस्थळे उभारावीत. सरकारने समाधीस्थळे उभारली नाहीत तर मराठा क्रांती मोर्चा व शिवप्रेमी संघटना स्वराज्यसेवा म्हणून श्रम,धनदान करून त्यांची दर्जेदार समाधीस्थळे उभारेल.

दिल्लीच्या तालकटोरा येथे मराठा वीर पेशवा बाजीराव पहिला, श्रीमंत महादजी शिंदे, श्रीमंत मल्हारराव होळकर यांची स्मारके उभारण्याची सुचना एकनाथ शिंदे, शरद पवार यांनी केली आहे. यातून छत्रपती शंभुपुत्र शाहू महाराज यांना वगळले जात आहे. हे अनाकलीय असून ही एकप्रकारे मराठा इतिहासाची मोडतोड होत आहे? त्याठिकाणी छत्रपती शंभुपुत्र शाहू महाराज यांच्या स्मारकाची मागणीही डॉ. लाखे पाटील यांनी केली.

आरएसएस प्रमुख मोहन भागवत आणि सावरकर स्मारकचे रणजित सावरकर यांच्या साहित्यातून बेजबाबदार, बदनामीकारक लिखाण वगळण्यात यावे व त्यांना कायदेशीर नोटीस देण्यात यावी व बदनामीकारक भाग पुढील आवृत्तीत सामाविष्ट करू नये अन्यथा कायदेशीर न्यायालयीन लढा देण्याचा ईशाराही यावेळी देण्यात आला.

## जनतेला त्रास ...

असता त्यांनी दिले नाही. त्यांच्यावर केवळ ४२० चा गुन्हा दाखल आहे. शासनाने कडक कायदा करावा व फसवणूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. ही खुप मोठी साखळी आहे, यात जे जे अधिकारी गुंतलेले आहेत त्या अधिकाऱ्यांचीही चौकशी होणार का? असा प्रश्नही आ. खोतकर यांनी उपस्थित केला. यावर मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर दिले ते म्हणाले, आ. खोतकर यांनी मांडलेली लक्षवेधी ही जनतेच्या हिताची तसेच गुंतागुंतीची आहे. या सर्व्हे नंबरचे खरेदी खत हे १९४१ ला झालेले आहे. मागच्या काळात बऱ्याच बाबी घडल्या.

मा. न्यायालयात, मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या. पाठक कमिशन नेमल्या गेले. या समितीचा अहवान हा मा. न्यायालयात आहे. मात्र, जालना जिल्हाधिकारी कार्यालयातून यातील काही पाने गायब करण्यात आली. सर्व प्रकरणाच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्तांची नियुक्त करण्यात येत आहे. पाठक कमिशनचा अहवाल मा. उच्च न्यालयाकडून घेऊन त्या अहवाल नेमके काय म्हटले आहे त्यानुसार तसेच सध्याची परिस्थिती पाहून विभागीय आयुक्त यांच्या अहवालानंतर शासन योग्य निर्णय घेईल.

जवळपास या चारही सर्व्हे नंबर वरील जागा विक्री झालेली आहे. नविन जे सुरु आहे. ते थांबवू सध्या या जमिनीवरील लेआऊट तसेच खरेदी- विक्री व्यवहार हे थांबवण्यात येतील. जोपर्यंत विभागीय आयुक्त अंतिम अहवाल देत नाहीत, तोपर्यंत सध्याचे सर्व व्यवहार थांबवण्यासंदर्भात नोंदणी मुद्रांक महानिरीक्षक यांना सुचना देण्यात येईल. हे सर्व झाल्यानंतर या चारही सर्व्हे नंबरवरील जवळपास तीनशे एकर जागेवर घरे बांधण्यात आलेली आहे. या घरांना गुंठेवारी कायद्यानुसार रेडीरेकनर नुसार दर लावून त्यांना कायदेशीर करण्यात येईल. त्या लोकांचे नुकसान होणार नाही. या घरांना सरकार प्रोटेक्शन देईल. जनतेला त्रास न होता भूमाफियांना कडक शासन करू म्हणत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आश्वस्त केले.

## कर्तव्यावर असतांना ...

याने शासकिय कामात अडथळा निर्माण करुन शिविगाळ करुन धक्काबुक्की केली. मोटारसायकल ढकलुन दिली. विजेचे कनेक्शन जोडले नाही. तर तुझे हात पाय तोडून टाकून जिवे मारुन टाकतो अशी जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. याप्रकरणी वरिष्ठ तंत्रज्ञ रामेश्वर भामट यांच्या फिर्यादीवरून सोन्यासिंग टाक रा.परतूर यांच्या विरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ अशोक गाढवे हे करीत आहेत.

### महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना म्हणून एक दिवसीय अन्नत्याग उपोषण

# सर्वपक्षीय आमदारांनो, तुम्ही आत्महत्या करून दाखवा तुमच्या कुटुंबाला १ ते ५ लाख रु. देऊ - एकनाथ कदम

**परतूर । प्रतिनिधी -** आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांविषयी सहवेदना व्यक्त करण्यासोबत त्यांच्या विषयाची बांधिलकी बळकट करण्यासाठी. तसेच ज्या धोरणांमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. त्या धोरणांचा निषेध व्यक्त करण्यासाठी बुधवार (दि १९ मार्च) रोजी उपविभागीय कार्यालय परतुर समोर एक दिवशी अभिनव अन्नत्याग आंदोलन करण्यात आले.

१९ मार्च १९८६ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण गावचे शेतकरी साहेबराव करपे यांनी शेती परवडत नाही म्हणून पत्नी मुलांसह सामूहिक आत्महत्या केली. ती महाराष्ट्रातील पहिली आत्महत्या होती. तेव्हापासून ते आजपर्यंत चार लाखांच्या वर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. २०२४-२५ वर्षात आज पर्यंत महाराष्ट्रात २७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यात एकट्या मंठा तालुक्यात १४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फुटावी समाजातील घटकांना सुद्धा याची जाणीव व्हावी. या उद्देशाने समाजातील तालुक्या सह महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना म्हणून एक दिवस अन्नत्याग उपोषण आले.

या अन्नत्याग आंदोलनामध्ये १८ वर्षावरील सर्वच नागरिकांनी सहभाग घेतलेला होता. या मधून समाजप्रबोधन व्हावे याच उद्देशाने परतुर तालुक्यातील सर्वच संघटनांना व सर्वपक्षीय यांनी एकत्र येऊन एक दिवसाचे अन्नत्याग उपोषण करण्यात आले. आपल्या शेतकरी बांधवांप्रति संवेदना व्यक्त करायचे होते. एक दिवसाचा उपवास ठेवून यामध्ये जात, धर्म, पंथ याच्या पलीकडे जाऊन कुठल्याही विषयाला थारा दिला नाही. त्यामुळे या आंदोलना मध्ये सर्व समाजाने आपला सहभाग नोंदवला होता. आपली कृतज्ञता दाखवून शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

देशात खुल्या अर्थव्यवस्थेनंतर कमाल शेत जमीन धारणा, सिलिंग, जीवनावश्यक वस्तूंचा कायदा आणि जमीन अधिग्रहण आदी कायद्यांच्या जोखडात शेतकरी अडकून पडला आहे. पहिल्या घटनादुरुस्तीने या शेतकरी विरोधी कायद्यांना जन्म दिला. या दुरुस्तीच्या वेळी प्रतिष्ठानं जोडून त्यात २०० च्या वर शेतकरी विरोधी कायद्यांच्या समावेश करण्यात आला. तेव्हापासून शेतकऱ्यांची कृषी, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक पातळीवर सातत्याने कोंडी




सुरू आहे. मेक इन इंडिया, समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन अशा राजकीय घोषणा रोज कानावर पडत असताना महाराष्ट्रात सरासरी १० शेतकरी दररोज आत्महत्या करतात. त्याची मात्र चर्चा कुठेच होत नाही. शेतकऱ्यांच्या न बदललेल्या विदारक कथेकडे लक्ष वेधण्यासाठी १९ मार्च रोजी हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत अन्नत्याग हे अभिनव आंदोलन केले गेले व विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या मार्फत देण्यात आले.

यामध्ये शेतकऱ्यांवरील संकट गडद आत्महत्यांचे प्रमाण वाढले म्हणून १) शेतकऱ्यांना प्रतिकुटुंब १८ हजार द्या.


ज्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न येऊ लागले, त्या कुटुंबातील आत्महत्या टळल्या आहेत असे दिसून येते. केवळ शेतीवर अवलंबून राहिलेल्या १०-१५ टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबात शेतीबाह्य उत्पन्न कसे येईल याचा तातडीने विचार केला पाहिजे. सरकारी कर्मचा-यांच्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यासाठी १८ हजार रुपये महिना ठरवले आहे, तसे १८ हजार रुपये महिन्याला या कुटुंबांना पोचविण्याची तरतूद सरकारने करावी. यासाठी इतर अनुदाने आणि योजना बंद करावी लागली तर ती बंद करावी. २) विशेष अधिवेशन बोलवा. संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणाऱ्या साहेबराव करपे कुटुंबाच्या सामूहिक आत्महत्येला १९ मार्च रोजी ३९ वर्षे होतात. या काळात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु लोकसभा व विधानसभेत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा सादर ठराव देखील करण्यात आला नाही. राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रती संवेदना शून्य झाले आहेत . १९ मार्च हा शेतकारी सहवेदना दिवस आहे, दरवर्षी याच दिवशी लोकसभा-विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे. आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत यासाठी उपाययोजना कराव्यात. तसेच ३) मंठा तालुक्यात २३-२४ मध्ये १४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती काल सरकारने निधानभवनात दिली. अशा घटना थांबण्यासाठी परतूर मंठा तालुक्यासाठी निम्न दुधना प्रकल्पातून लिफ्ट इरिकेशन योजना राबवून सिंचनाची तात्काळ सोय करावी. अशा मागण्या याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदना द्वारे करण्यात आल्या.

याप्रसंगी शेतकरी नवनाथ तनपुरे (सहकुटुंब), एकनाथ (अप्पा) कदम, रमेश डाके, अशोक तनपुरे, महेश नळगे, पांडुरंग नवल, योगेश मोगल, तुकाराम तनपुरे, गणेश राजबिंडे, भाऊसाहेब मुके,आदी शेतकरी बांधवांनी दिवसभर अन्नत्याग आंदोलन केले.

याप्रसंगी अनेक शेतकरी पुत्रांनी भेट देऊन एक दिवशीय अन्नत्याग आंदोलनास पाठिंबा दिला. **सर्वपक्षीय आमदारांनो, तुम्ही आत्महत्या करून दाखवा तुमच्या कुटुंबाला १ ते ५ लाख रु. देऊ असे मत एकनाथ कदम व आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केले.**

## औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी विहिंप व बजरंगदलचे तहसीलदारांना निवेदन

**मंठा । प्रतिनिधी -** कुरकर्मा औरंगजेबाची कबर शासनाने हटवावी, नसता आम्ही हटवतो, असा ईशारा विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने मंठा तहसील येथे आंदोलनप्रसंगी दिला आहे. औरंगजेबाच्या कबरीबाबत उद्भवलेल्या विषयाच्या अनुषंगाने आज सोमवारी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला पुष्पहार घालून व मंठा तहसिल कार्यालयासमोर निदर्शने करून निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, औरंगजेब हा हिंदुव्देष्टा होता. त्यामुळे त्याची कबर हटविणे आवश्यक आहे. त्याने केलेले अन्याय-अत्याचार आजही हिंदु विसरेलेले नाहीत. शिख धर्मगुरूंची त्याने केलेली हत्या आणि हिंदु मंदीरांवर केलेले हल्ले लक्षात घेता त्याच्या कबरीची आपल्याला कुठलीही गरज नाही. त्याने काशी येथे विश्वेश्वर मंदीरावर हल्ला करून मथुरेतील मंदीरांचा उध्दवंस केला आहे. अनेक हिंदूंची त्याने हत्या केली असून, छत्रपती संभाजीमहाराजांना दिलेल्या मरणयातना आजही हिंदू विसरलेले नाहीत. त्यामुळे त्याची कबर नष्ट होणे आवश्यक असून, त्याबाबत योग्य वेळेत निर्णय न घेतल्यास विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल संभाजीनगरकडे कूच करेल आणि ही कबर नष्ट करतील, असा ईशारा या निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. या निवेदनावर विश्व हिंदू परिषदेचे राधाकिसन बोराडे,डिगंबर मुळे,आसाराम काकडे,संदीप गायकवाड, संजय गायकवाड, सतीशराव निर्वळ, सुदर्शन बोराडे,अमोल वरकड, भक्तीराम बोराडे, विशाल राठोड, नरेश सांगोळे, बोराडे ज्ञानेश्वर, वैभव बोराडे,राहुल चव्हाण,किरण सोनार,कृष्णा बोराडे,सुमित जोशी,सखाराम बोराडे,योगेश बोराडे, स्वप्नील देशमुख, सचिन गुजर,संतोष तिवारी,पांडुरंग पारखे,अंजीराम



डाके,उमेश पीसे, वैभव काळे, पवन जाधव,सौरभ चाकरे, शिवहारी,स्वप्नील घारे,बाळासाहेब खरात यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अविनाश लोमटे यांची महादीप हवाई सहलीसाठी निवड

**मंठा । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतून महादीप उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विमान प्रवासाद्वारे राज्यात व राज्याबाहेरील सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सहलीसाठी महादीप जिल्हास्तरीय परीक्षेच्या माध्यमातून इयत्ता पाचवी ते आठवी या वर्गातील ४४ विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे निवड करण्यात आली आहे. सदर सहलीत विद्यार्थ्यांसोबत जाणाऱ्या अधिकारी व शिक्षक यांच्या टीममध्ये श्रीराम तांडा शाळेचे मुख्याध्यापक श्रीअविनाश लोमटे यांची निवड करण्यात आली आहे.

महादीप सहल दिनांक १९ मार्च ते २५ मार्च या दरम्यान जाणार आहे. महादीप सहलीच्या माध्यमातून जिल्ह्यातील ४४ विद्यार्थ्यांना हैदराबाद-अहमदाबाद-गुजरात-मुंबई येथील वैज्ञानिक संशोधन केंद्र व प्रेक्षणीय स्थळे पाहण्याची संधी मिळणार आहे. सदर ४४ विद्यार्थ्यांसोबत जाण्यासाठी जिल्हा परिषद जालना चे शिक्षणाधिकारी श्री कैलासजी दातखीळ यांनी अधिकारी व शिक्षक यांचा समावेश असणारी दहा जणांची टीम निवडलेली आहे. या टीममध्ये उपशिक्षणाधिकारी, जेष्ठ अधिव्याख्याता,आरोग्य अधिकारी व शिक्षक यांची निवड करण्यात आली आहे. इयत्ता पाचवी वर्गातून सहलीसाठी गुणानुक्रमे निवडलेल्या १० विद्यार्थ्यांमध्ये मंठा तालुक्यातील श्रीरामतांडा जि प शाळेतील दोन विद्यार्थ्यांची निवड झाली असल्याने त्यांना मार्गदर्शन करणारे व तयारी करून घेणारे वर्गशिक्षक तथा शाळेचे मुख्याध्यापक श्री अविनाश लोमटे यांचे शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांनी निवड करून संबंधिताच्या कार्याचा सन्मान केला आहे.या निवडीबद्दल श्री अविनाश लोमटे यांचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण,गटशिक्षणाधिकारी विपूल भागवत,शिक्षणविस्ताराधिकारी के. जी राठोड,केंद्रप्रमुख रामेश्वर शिंदे,विलास माथने,श्रीकांत अंबुरे, सुनीता दुभळकर,अर्चना लांडगे,पूजा नागटिळक,अभिमान बायस, संतोष गिर्हे, विद्या पतंगे व ज्योती चव्हाण यांनी अभिनंदन केले.

## रेखा बैजल यांना हिंदी साहित्य अकादमी पुरस्कार

### ५० हजाराचा धनादेश आणि शाल-श्रीफळ देवून सन्मान

**जालना । प्रतिनिधी -** मराठी व हिंदी भाषेत लेखन करणार्या रेखा बैजल यांच्या 'अज्ञेय' या हिंदी कादंबरीस महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा 'जैनेंद्र जैन' पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकादमीच्या उपाध्यक्षा श्रीमती मंजू लोढा यांच्या हस्ते ५० हजाराचा धनादेश आणि शाल-श्रीफळ देवून सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देत सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम मुंबई येथील रंगशारदा भवन येथे संपन्न झाला.

यापूर्वी २७ फेब्रुवारीला मुंबई येथील गेटवे ऑफ इंडियाच्या प्रांगणात उभारलेल्या भव्य सभा मंडपामध्ये रेखा बैजल यांच्या 'तुमचा आमचा संजू' या बालकादंबरीस महाराष्ट्र शासनाचा साने गुरुजी राज्य पुरस्कार प्रदान केला गेला. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे व भूतपूर्व संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्याहस्ते ५० हजाराचा धनादेश, शाल व स्मृतिचिन्ह देऊन रेखा बैजल यांना गौरविण्यात आले. महाराष्ट राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार हे या प्रसंगी उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल रेखा बैजल यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.




# आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची; आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर!

जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबतच खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे.कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे.अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.कारण दिवसेंदिवस चिमण्यांसह इतरही पक्षांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडु शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार व बदलत्या हवामानामुळे त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे. त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे.चिमण्यांच्या अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला. भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे. आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते.हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे.त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही.अशी कठीण व गंभीर परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले.यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते. त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे. जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे.परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत. परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्ष्यी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे.कारण पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची.चिव चिव ये चारा खा पाणी पी आणि भुर्र उडून जा असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले.कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करू या.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**स्वतंत्र पत्रकार,**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# पुढील महिनाभरात १७३ व ९५ गाव वॉटर ग्रीडचे पाणी घराघरात पोहोचवा - आ. बबनराव लोणीकर

# चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना माफी नाही

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या सदस्य सचिवांसमोर आमदार बबनराव लोणीकरांनी अधिकाऱ्यांची घेतली झाडाझडती

**मुंबई** - परतूर विधानसभा मतदारसंघातील १७३ गाव व ९५ गाव वॉटर ग्रीड चे काम मागील अनेक दिवसांपासून अत्यंत संथ गतीने सुरू असून १७३ गावांपैकी अद्याप पर्यंत ५२ गावात पाणी पोहोचलेले नाही त्याचप्रमाणे ९५ गाव वॉटर ग्रीड अंतर्गत देखील सर्व ९५ गावांमध्ये अद्याप पर्यंत पाणी पोहोचलेले नाही अशा परिस्थितीत अधिकाऱ्यांनी सजग राहून अत्याधिक कष्ट घेत पुढील पुढील महिनाभरात १७३ व ९५ गाव वॉटर ग्रीडचे पाणी घराघरात पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेत असे आमदार बबनराव लोणीकर यांनी मुंबई येथे पार पडलेल्या बैठकीदरम्यान अधिकाऱ्यांना सुचित केले.

आमदार बबनराव लोणीकर व मजिप्रा सदस्य सचिव श्री अभिषेक कृष्णा यांच्या उपस्थितीत मुंबई येथील नरिमन पॉईंट च्या कार्यालयात आज महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला मुख्य अभियंता श्रीमती पलांडे अधीक्षक अभियंता श्री कोळी कार्यकारी अभियंता श्री चव्हाण उपाभियंता गाडे, दांडगे, गायकवाड, गाझी यांच्यासह कंत्राटदार श्री घुले उपस्थित होते. वॉटर ग्रीड योजनेसाठी होत असलेल्या दिरंगाईबाबत आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी अधिकाऱ्यांना चांगलेच खाडसावले. याप्रसंगी बोलताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव श्री अभिषेक कृष्णा म्हणाले की वारंवार बैठका घेतल्या जातात ही बैठक देखील योजना पूर्ण करण्यासंदर्भात तिसरी बैठक आहे. केवळ वारंवार बैठका घेऊन अधिकारी जर या सर्व बाबींकडे दुर्लक्ष करणार असतील तर हे अत्यंत गंभीर बाब असन

अधिकाऱ्यांनी गांभीर्यपूर्वक योजना पूर्ण करण्यासाठी तातडीने प्रयत्न करणे आवश्यक आहे परंतु बैठकीदरम्यान दिलेल्या सूचना अधिकारी गांभीर्याने घेत नाहीत असे निदर्शनास आले आहेत अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता उप अभियंता यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालय राहण्याचे आदेश यावेळी सदस्य सचिव अभिषेक कृष्णा यांनी दिले आदेशाचे पालन न केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असा सज्जड दम अभिषेक कृष्णा यांनी यावेळी दिला

यादरम्यान बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना कदापि माफ करणार नाही. परतुर विधानसभा मतदार संघातील पाच लाख लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने अत्यंत महत्त्वाकांक्षी असणारी वॉटर ग्रीड योजना सुरू केली आहे अधिकाऱ्यांच्या निष्काळजीमळे व कामचूकारपणामुळे अद्याप पर्यंत सर्व गावांमध्ये पाणी पोहोचलेले नाही त्यामुळे योजना पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी ताकतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे जोपर्यंत अधिकारी कामचुकरपणा करतील तोपर्यंत योजना पूर्ण होऊ शकणार नाही त्यामुळे अधिकाऱ्यांनी तत्पर राहून काम करणं अपेक्षित आहे जे अधिकारी चुकीच्या पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न करतील किंवा कामांमध्ये हलगर्जीपणा करतील त्यांना कदापि माफ करणार नाही अशा शब्दात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या सदस्य सचिवांसमोर आमदार बबनराव लोणीकरांनी अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली.



योजनेचा कालावधी संपलेला असताना देखील अद्याप पर्यंत अनेक गावांमध्ये पाणी पोहोचलेले नाही ही बाबत संत गंभीर असून या सर्व बाबींचा तात्काळ आढावा घेण्यात यावा यासह जे अधिकारी हेतू पुरस्सर कामसूकारपणा करत आहेत तो कदापी सहन केला जाणार नाही. आधीच गावागावांमध्ये पाणी पोहोचण्यासाठी उशीर झाला असून आता या सर्व गावात पाणी पोहोचण्यासाठी अधिकचा विलंब नको अशा शब्दात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव श्री अभिषेक कृष्णा यांनी सूचना केली. आमदार बबनराव लोणीकर यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे तात्काळ प्रगती अहवाल तयार करण्यासंदर्भात सूचना केली होती. यासंदर्भात पुढे बोलताना सदस्य सचिव श्रीकृष्ण म्हणाले की मजिप्रा मुख्य अभियंता यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स घेऊन लेखी स्वरूपात अहवाल सादर करावा जेणेकरून कामजुकार अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करता येईल.

आतापर्यंत १७३ गावांपैकी ५२ गावांमध्ये पाणी पोहोचले नाही त्याचप्रमाणे ज्या १२१ गावांमध्ये पाणी पोहोचले त्या गावांचा देखील आढावा घेण्याचे सूचना आमदार बबनराव लोणीकर यांनी केले यादरम्यान १२१ गावांमध्ये पाणी कधी पोहोचले? पोहोचलेले पाणी पिण्यास योग्य आहे का? केवळ ट्रायल घेण्यापुरतेच पाणी गावात पोहोचले त्यानंतर पाणी पोहोचले नाही अशी परिस्थिती आहे का? काही गावांमध्ये एक वर्ष दोन वर्ष तर काही गावात तीन वर्षांपूर्वी किंवा ट्रायल घेण्यापुरतेच पाणी (रॉ वॉटर) पोहोचले होते. त्यानंतर पुन्हा गावात पाणी आले नाही अशी परिस्थिती आहे का? या सर्व बाबी गाव पातळीवर सरपंच व ग्रामसेवक यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे चर्चा करून लेखी स्वरूपात देखील माहिती मागवणत यावी अशी पान २ वर




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.